## एअर इंडिया अपघात बाबत 'डेली मेल' मध्ये प्रसिद्ध वृत्ताबाबत माध्यम उपस्थित प्रश्नांवर अधिकृत प्रवक्त्यांची प्रतिक्रिया (23 जुलै 2025)

23 जुलै 2025

एअर इंडिया अपघात बाबत 'डेली मेल' मध्ये प्रसिद्ध वृत्ताबाबत माध्यम उपस्थित प्रश्नांवर प्रतिक्रिया देताना, अधिकृत प्रवक्ते श्री. रणधीर जैस्वाल म्हणाले:

आम्ही वृत्ताचं अवलोकन केलं आहे. चिंता आणि मुद्दे आमच्या निदर्शनास आल्यापासून आम्ही यूके समवेत बारकाईनं परिस्थितीची माहिती घेत आहोत.  या दुःखद अपघाताच्या पार्श्वभूमीवर, संबंधित अधिकाऱ्यांनी स्थापित प्रोटोकॉल आणि तांत्रिक आवश्यकतांनुसार दुर्घटनाग्रस्तांची ओळख निश्चित केली. सर्व मृतदेहांवर अत्यंत काळजीपूर्वक आणि मृतांच्या प्रतिष्ठेचा आदर ठेवून अंत्यसंस्कार पार पडले. आम्ही या समस्येशी संबंधित कोणत्याही समस्यांचे निराकरण करण्यासाठी यूके प्राधिकरणांच्या समवेत सातत्याने संपर्कात आहोत.

**नवी दिल्ली**

23 जुलै 2025